# व्यंकटेश महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतर-महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न

श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे कर्मयोगी कै. मदनलालजी बोहरा (शेठजी) यांच्या जयंती निमित्ताने पदवी स्तरावरील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचा शुभारंभ प्रतिमा पूजन, उद्घाटन व स्पर्धेच्या सुरुवातीने झाला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने, डॉ. एस. एन. जरंडीकर, तसेच श्री. एम. पी. केसरकर उपस्थित होते. राज्यभरातील विविध महाविद्यालयांमधील स्पर्धकांनी या स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला. समाजातील व तंत्रज्ञानाशी संबंधित विविध समसामयिक विषयांवर प्रभावी व विचारप्रवर्तक मते व्यक्त करण्यात आली. स्पर्धेसाठी सावधान आपण ऑनलाइनच्या जगात प्रविष्ट आहात, जागतिक युद्धभूमी आणि बदलते आंतरराष्ट्रीय संबंध, भाषा राजकारणाचे प्रांगण की संवादाचे अंगण, मनोधैर्य हरवत चाललेली तरुणाई, बदलती भारतीय कुटुंब व्यवस्था : चिंतनाची गरज, विकासाच्या वाटेवर नको निसर्गाची पायमल्ली असे विविध विषय ठेवण्यात आले होते. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून स्पर्धक आले होते यामध्ये पुणे, अलिबाग, नागपूर, सातारा, कराड, कोल्हापूर अशा विविध भागातून स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक न्यू कॉलेज, कोल्हापूर येथील संकेत कृष्णात पाटील, द्वितीय क्रमांक पी.एन.पी. महाविद्यालय, अलिबाग येथील पंकज पंढरीनाथ पांडूळे, तृतीय क्रमांक डी. के. टी. ई . कॉलेज, इचलकरंजी येथील ऋतुजा सतीश पवार, उत्तेजनार्थ पहिले पुणे जिल्हा शिक्षण मंडळ विधी महाविद्यालय, हडपसर पुणे येथील संतोष सर्जेराव शिंदे तर उत्तेजनार्थ दुसरे संताजी महाविद्यालय, नागपूर येथील अनिकेत रामा वनारे यांनी प्राप्त केले. प्रथम क्रमांकाचे रोख अकरा हजार व स्मृतिचिन्ह पारितोषिक संस्थेचे प्रेसिडेंट श्री.श्रीनिवासजी बोहरा शेठजी, द्वितीय क्रमांकाचे रोख आठ हजार व स्मृतिचिन्ह पारितोषिक श्री. अमीन बाणदार व श्री व्यंकटेश महाविद्यालय, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक रोख सहा हजार व स्मृतिचिन्ह संस्थेचे विश्वस्त श्री. ए. बी.जोशी, प्रथम उत्तेजनार्थ पारितोषिक गोविंदराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे माजी मुख्याध्यापक बी.पी. कवडगे, उत्तेजनार्थ दुसरे नाबा एज्युकेशन सोसायटी शिक्षक सेवकांची सहकारी पतसंस्था यांच्याकडून देण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभात विजेत्यांना आकर्षक रोख रक्कम व प्रमाणपत्रे देण्यात आली. पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रेसिडेंट श्री.श्रीनिवासजी बोहरा शेठजी होते. प्राचार्य डॉ.व्ही. ए.माने यांनी प्रास्ताविक सादर केले. डॉ. एस. एन.जरंडीकर यांनी परीक्षकांची ओळख करून दिली. कार्यक्रमासाठी अहमद मुजावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. एम. पी. केसरकर यांनी केले,तर कु. मोहिनी आंचलिया यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले.


NAAC Grade 'A'
सारंग दास,इचल.